## जगभर

# पाकिस्तान : आणखी एका पंतप्रधानाची गच्छंती

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

लोकांच्या आकांक्षा सतत ७० वर्षे धुळीला मिळवण्यात भारतीय उपखंडात पाकिस्तान अग्रेसर म्हणावा लागेल.

**अशुभ प्रारंभ**

११ ऑगस्ट १९४७ ला त्यांच्या घटना-समितीपुढे भाषण करताना मोहम्मद अली जीनांनी पाकिस्तान कसा असावा हे निस्संदिग्ध शब्दांत स्पष्ट केले होते - तुम्हाला तुमच्या मंदिरांमध्ये, मशिदींमध्ये किंवा इतर कोणत्याही प्रार्थनास्थळात जाण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. तुमचा धर्म, जात, वंश कोणताही असू दे, राष्ट्रबांधणीचा प्रकल्प आणि या श्रद्धा पूर्णत: विभक्त आहेत.

१४ जून १९४८ला लष्करी अधिकाऱ्यांसमोर बोलताना त्यांनी फक्त नागरी सरकार लष्कराला आदेश देऊ शकते, ते आदेश लष्कराने पाळायचे असतात, हेही स्पष्ट केले होते. पाकिस्तानच्या स्थापनेची ही दोन तत्त्वे होती.

११ सप्टेंबर १९४८ला जीनांना क्वेट्टा या शहराहून पाकिस्तानच्या त्यावेळच्या राजधानीला - कराचीला - लष्करी विमानाने आणण्यात आले. ते क्षयाने गंभीर आजारी होते. आधी डॉक्टरांना वाटले होते क्वेट्टाच्या कोरड्या हवेने विकारात उतार पडेल. ते झाले नाही तेव्हा कराचीची समुद्रकाठाची हवा जास्त बरी असे वाटले, म्हणून कराची. विमानातून त्यांना स्ट्रेचरवर ॲम्ब्युलन्समध्ये ठेवण्यात आले. विमानतळ ते त्यांचे घर हे अर्ध्या तासाचे अंतर. पण ॲम्ब्युलन्स वाटेत बंद पडली. पर्यायी व्यवस्था नव्हती. दुसरी ॲम्ब्युलन्स येईपर्यंत दोन तास गेले. तोपर्यंत ते कराचीच्या उष्ण दमट हवेत स्ट्रेचरवर पडून होते. त्या दिवशी संध्याकाळी त्यांचा अंत झाला.

अब्बास नसीर या 'द डॉन' नावाच्या प्रतिष्ठित पाकिस्तानी दैनिकाच्या माजी संपादकाच्या शब्दांत तेव्हाचा डॉक्टरांचा संदेह आणि पर्यायी ॲम्ब्युलन्स नसणे या घटना पाकिस्तानसाठी भविष्यसूचक ठरल्या.

**जीनांनंतर इस्लामकडे आणि लष्कराकडे**

जीनांच्या निधनानंतर सहा महिन्यातच पाकिस्तानची वाटचाल 'मुस्लीम' राष्ट्राच्या दिशेने सुरु झाली. १२ मार्च १९४९ ला इस्लाम हाच देशाचा अधिकृत धर्म असेल , देशाचे नाव 'पाकिस्तान प्रजासत्ताक' न रहाता 'मुस्लीम पाकिस्तान प्रजासत्ताक' करावे असा प्रस्ताव आला व १९५६ साली मान्यही झाला. निधर्मी राष्ट्राचा जीनांचा आग्रह संपुष्टत यायला सुरुवात झाली. १९५८ला जनरल आयूब खानने लष्करी राजवट आणली. मग याह्या खान, झिया उल हक या लष्करशहांनी तशीच लोकशाही नाकारत लष्करी सत्ता बळकट केली. नागरी अमलाखालाचे लष्कर हे जीनांचे स्वप्नही विरले. भुट्टो महाशयांनी लोकनिर्वाचित असूनही अहमदियापंथीय मुस्लीम खरे मुस्लीम नाहीतच असा कायदा करून त्या अल्पसंख्यांकांचा छळ वैध केला. तोच अनिष्ट कार्यक्रम चालू ठेवत झिया उल हकने आजच्या सुन्नी मुस्लीम आतंकवादाला सुरुवात केली. (मूलतत्त्ववादाची बीजे १९६५ पासूनच रोवली गेली होती - ते पुढे नमूद केले आहे.) त्यासाठी रशियाचे अफगाणिस्तानवरील आक्रमण उपयोगी पडले आणि या प्रकल्पाला सौदी अरेबिया, अमेरिका यांनी सढळ हाताने मदत केली. असाच उपयोग नंतर मुशर्रफने अमेरिकेच्या अल-कईदाच्या विरुद्धच्या अफगाणिस्तानमधील कारवाईचा करून घेतला.

पाकिस्तानी न्याय-संस्थेने प्रत्येक वेळी लष्करी राजवट वैध ठरवली आहे. प्रत्येक निर्वाचित सरकार भ्रष्टाचाराच्या किंवा अक्षमतेच्या आरोपाखाली बरखास्त केले आहे. अगदी निर्वाचित पंतप्रधानाला फाशी देण्यापर्यंत (भुट्टो) या संस्थेने लष्कराची मर्जी राखलेली आहे. जे न्यायाधीश स्वतंत्र वागतात त्यांना निवृत्त केले जाते. त्यामुळे त्या संस्थेची विश्वासार्हता रसातळाला गेलेली आहे.

एकूण वाटचाल पाहता, लष्कर स्वत: तरी अधिकृतरीत्या सत्तेवर असते किंवा निर्वाचित सरकारला मुठीत ठेवते. दर काही वर्षांनी बहुधा उजवीकडे झुकणारा एक राजकीय पक्ष उगवतो. त्याला लष्कराचा व नोकरशाहीचा पाठिंबा असतो. इकडचे तिकडचे आयाराम, गयाराम गोळा करून हा पक्ष बहुमत असणाऱ्या सत्ताधारी पक्षाविरुद्ध उभा रहातो. त्याचा अजेंडा प्रतिगामी असतो. ते आता पाहू.

**लष्कर व राजकीय पक्ष**

ही परंपरा १९५५ सालापासून चालू आहे. तेव्हा पश्चिम पाकिस्तानात रिपब्लिकन पक्ष अस्तित्वात आला. तेव्हाच्या पूर्व पाकिस्तानची मागणी राष्ट्रीय स्तरावर योग्य राजकीय प्रतिनिधित्व मिळावे, राष्ट्रीय उत्पन्नातील योग्य हिस्सा मिळावा अशी होती. पण रिपब्लिकन पक्ष पश्चिम पाकिस्तानी नोकरशाही आणि लष्कर यांच्या पूर्व पाकिस्तानाबद्दलच्या आकसातून जन्माला आलेला. त्यामुळे त्यांना ते मान्य नव्हते. हा लष्कराचा पहिला पक्ष. तो १९५८ च्या आयूब खानच्या लष्करी राजवटीमुळे १९५८ लाच

गुंडाळला गेला. आयूब खान १९५८ ते १९६९ पर्यंत सत्तेवर होता. तेव्हा १९६५ च्या अध्यक्षीय निवडणुकात फातिमा जीना या मोहम्मद अली जीनांच्या बहिणीचा पराभव करण्यासाठी आयूब खानने मुस्लीम मूलतत्त्ववाद्यांना तिच्याविरुद्ध प्रोत्साहन दिले. म्हणजे हा प्रश्न ५० वर्षांपूर्वी सुरु झाला आहे. मग पूर्व पाकिस्तानात उठाव सुरु झाला आणि पश्चिम पाकिस्तानी लोकांच्या असंतोषाने आयूब खानला सत्ता सोडावी लागली. पण रिपब्लिकन पक्षाने पेरलेल्या विषाचा परिणाम १९७१ च्या बांगलादेश युद्धात झाला. दरम्यान याह्याखान सत्तेवर आला. (१९६९ ते १९७१). बांगलादेश निर्मितीनंतर पाकिस्तान पीपल्स पार्टीचा झुल्फिकार भुट्टो निवडून येऊन पंतप्रधान झाला. १९७७ ला हे सरकार उलथून झिया उल हकने सत्ता हाती घेतली आणि भुट्टोला फाशी दिली. पीपल्स पार्टी आणखी खच्ची करण्यासाठी मग झियाने नवाझ शरीफला पुढे आणले, तेव्हा शरीफ पंजाब प्रांताचा मुख्यमंत्री होता. शरीफची पाकिस्तान मुस्लीम लीग (नवाझ) हा लष्कराचा पक्ष झाला. ८० - ९० च्या दशकांत आलटून पालटून बेनझीर भुट्टो आणि शरीफ पंतप्रधान होत राहिले. तेव्हा लोकनिर्वाचित भुट्टो सरकार डळमळीत करण्यासाठी शरीफ - लष्कर भागीदारी झाली. काही काळ ती चालली कारण दोन्ही पक्षांना ती सोयीची होती. पण १९९७ साली शरीफ दुसऱ्यांदा पंतप्रधान होईपर्यंत याही संबंधात तणाव येऊलागला होता. शरीफने १९९९ साली तेव्हाचा लष्करप्रमुख परवेझ मुशर्रफला हटवण्याचा प्रयत्न केला. तो फसला आणि शरीफचे सरकार पाडून मुशर्रफने सत्ता हातात घेतली. शरीफला तुरुंगवास झाला, मग हद्दपार करून त्याला सौदी अरेबियात पाठवण्यात आले. २००२ ला मुशर्रफने स्वत:चा पक्ष काढला. पण २००८ ला त्यालाही राजीनामा द्यावा लागला. मग हा पक्षही संपला. आणि परत लोकशाही आली. भुट्टोचा पक्ष सत्तेवर आला. (बेनझीरचा २००७ला खून झाला) बेनझीरचा नवरा तिचा करिष्मा आणि पैसा या जोरावर राष्ट्राध्यक्ष झाला. प्रत्येक सरकारी कंत्राटात १० टक्के लाच घेण्यामुळे या गृहस्थांना Mr 10% म्हणण्यात येत असे. २०१३ च्या निवडणुकांत नवाझ शरीफचा पक्ष त्यांना हरवून प्रचंड बहुमताने निवडून आला.

**इम्रान खान**

आता शरीफ जरा हाताबाहेर जात आहे, लष्कराला आळा घालत आहे, हे दिसता लष्कराला इम्रान खान आपला माणूस वाटतो. म्हणजे जी भूमिका शरीफने बेनझीर भुट्टोविरुद्ध बजावली, ती आता इम्रान बजावणार असे दिसते. १९९६ साली इम्रानने स्वत:चा पक्ष स्थापन केला. आपल्याकडच्या 'आप' सारखी थोडीफार प्रामाणिकपणाची झळाळी त्याला सुरुवातीला लाभली पण मुख्यत: हा व्यक्ति-केंद्रित पक्ष. सुस्थित मध्यम-वर्गीय शहरी सुशिक्षितांना त्याचे तेव्हा आकर्षण वाटले. गेल्या सहा वर्षात हे चित्र बदलले आहे. कारण वर म्हटलेल्या 'परंपरे'प्रमाणेच नोकरशाही आणि लष्कर यांचा पाठिंबा वाढू लागला आहे. इतर पक्षातील भ्रष्टाचारी व गुन्हेगार मंडळींचे इम्रानच्या पक्षात स्वागत होत आहे. पहिल्यापासून पक्षाबरोबर असणाऱ्यांना हे स्वागत नापसंत आहे. 'असे लोक नकोत' या मुद्द्यावर तर पक्ष स्थापन झाला. शरीफविरोधी भूमिका मूलत: भ्रष्टाचारविरोधी भूमिका होती. त्यात पनामा पेपर्स प्रकरण आयते हातात आले. आणि त्या खटल्याचा परिणाम म्हणून नवाझ शरीफला २८ जुलैला सत्ता सोडावी लागली.

पण इम्रानच्या पक्षालाही परदेशी पैसा मिळाल्याचे आरोप आहेत. ती चौकशी चालू आहे. त्याच्या विरोधी अशी माहिती मिळालीच तर लष्कर त्याला black-mail करू शकते. आता सत्तेवर आणून हवी ती धोरणे आणू शकते किंवा केव्हाही उचल-बांगडीही करू शकते. शिवाय इम्रान पाकिस्तानातील दहशतवाद्यांबाबतही ठोस निषेधाची भूमिका घेत नाही. कोणाचाही पाठिंबा असो पण मला सत्ता मिळू दे अशी त्याची लक्षणे दिसतात. मग त्याच तिकिटावर तोच खेळ चालू राहील.

**कोर्ट आणि शरीफ**

पनामा पेपर्समध्ये आलेल्या माहितीप्रमाणे शरीफच्या मुलांची बरीच मालमत्ता पाकिस्तानाबाहेर आहे. (याचा उल्लेख मे २०१६च्या 'आंदोलन' - जगभरमध्ये केला आहे.). या सगळ्याच बेकायदेशीर संपत्तेची तपासणी Joint Investigation Team या सहा सभासदांच्या समितीने केली. त्यांनी १० खंडांचा अहवाल सुप्रीम कोर्टला दिला. पण कोर्टाने निर्णयासाठी या अहवालाची दखल घेतली नाही, हे विशेष. हा पडद्यामागचा लष्करी प्रभाव असावा. तो सगळाच अहवाल आपल्या अखत्यारीत येत नाही असे सांगून निरनिराळ्या कोर्टांना पाठवला गेला आहे. त्या त्या संबंधित आरोपांवर ती कोर्टे कारवाई करतील.

शरीफची गच्छंती झाली ती त्या मानाने मामुली तांत्रिक बाबीवर. त्याच्या मुलाची दुबईमध्ये एक कंपनी होती. शरीफ तिचा चेअरमन होता. ही गोष्ट १९८० च्या दशकातील. तेव्हा त्याला चेअरमन म्हणून वेतन मिळाले. पंतप्रधानासारखे निर्वाचित पद स्वीकारण्यासाठी अशा मिळकतीचा उल्लेख कायद्याने आवश्यक असतो. तो केला नाही म्हणून शरीफ सार्वजनिक जबाबदारीचे पद राखण्यास योग्य नाही असा निकाल देण्यात आला. निकालानुसार यापुढे त्याला असे कोणतेच पद स्वीकारता येणार नाही, तात्पर्य, अनेक चौकशांचा ससेमिरा व कोर्ट-कचेऱ्या याने त्याचा राजकीय अस्त शक्य आहे.

**चिंताजनक चित्र**

एकूण पाकिस्तानचा अर्वाचीन इतिहास व वर्तमान असे आहेत. शरीफ जाणे ही एकमात्र, सुटी घटना नाही. ती त्या देशाच्या

परंपरेचा भाग आहे हे स्पष्ट व्हावे.

जन्मापासून सगळ्या थरात मुरलेला भारतद्वेष हा याचा एक भाग. '१५% साक्षरता असलेल्या देशाला लोकशाहीची जरुरी नाही' असे पहिल्या राष्ट्राध्यक्षाचे - इस्कंदर मिर्झाचे - मत होते. हीच तुच्छता राजकीय वरच्या वर्गात आणि लष्करात आजपर्यंत चालू आहे, हा दुसरा भाग.

अतिश्रीमंत सत्ताधीश शरीफ, भुट्टो घराण्यांचे धोरण - कायद्यातून पळवाटा काढा, बँकेची कर्जे रद्द करून घ्या, खोटे हिशेब ठेवा, कर चुकवा, स्वस्तात मजुरांचे शोषण करा आणि स्वत:ची तुंबडी भरा. हे लोकशाही नेते. लष्कराचे हात देशातील इतर उद्योगात असतात. लष्कराला मध्य - पूर्व, अमेरिका, चीनची प्रचंड मदत आहे. तिसरा घटक म्हणजे इस्लामी आतंकवादी - ते देशांतर्गत व अफगाणिस्तान, काश्मीरमध्ये सक्रिय आहेत, त्यांचे स्त्रिया, अल्पसंख्यांक व शियांवरचे अत्याचारही वाढत आहेत. चौथा घटक प्रादेशिक स्वायत्ततेची मागणी - यासाठी अफगाण सीमा, बलुचिस्तान हे प्रदेश अशांत आहेत. पाचवा घटक अण्वस्त्रसज्ञता - ती अराजकात आतंकवाद्यांकडे जाणे भयावह आहे.

जीनांच्या अंतासारखाच नेतृत्वाचा आत्मसंदेह आणि पर्यायी व्यवस्था नसणे यामुळे सामान्य पाकिस्तानी नागरिकाचे हाल. ते या कोणाच्याच गणतीत नाहीत हे त्या देशाचे दुर्दैव.

अशा परिस्थितीत ही जास्तीची अस्थिरता भारताला निश्चित व सततचा धोका आहे.

*wwww.art-non-deco.com*
*artnondeco@yahoo.co.uk*